1 8 APR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात मधुमेहाला प्रतिबंध करणारे संशोधन

## तंत्रज्ञानाचे लवकर औद्योगिक हस्तांतरण; सामंजस्य करारावर स्वाक्षरी



शिवाजी विद्यापीठातील रुसा केंद्राच्या नामफलकाचे अनावरण खासदार धनंजय महाडिक आणि कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, प्रधान सचिव मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नांदेडचे प्र-कुलगुरु डॉ. जी. एन. शिंदे, डी. जी. गुणे उपस्थित होते.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या १५ वर्षांच्या अथक संशोधनातून निर्माण करण्यात आलेल्या मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या तंत्रज्ञानाचे लवकरच हस्तांतरण करण्यात येणार आहे. त्या संदर्भातील सामंजस्य कराराचा प्राथमिक टप्पा म्हणून 'लेटर ऑफ इन्टेन्ट'वर (आशय पत्र) सोमवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

विद्यापीठातील प्रा. डॉ. अकल्पिता अरविंदेकर या गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहपूर्व ते मधुमेह होण्याच्या वाटचालीस प्रतिबंध करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करीत आहेत. त्यासाठी त्यांना ३५ लाख रुपयांचा विशेष प्रकल्पही मंजूर झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांचा संघ मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत संशोधन करीत आहे. या संघाने मानवावर घेतलेल्या चाचण्याही कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे हे मधुमेहपूर्व उपचारविषयक तंत्रज्ञान व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आता औद्योगिक हस्तांतरणास सज्ज आहे. त्या दृष्टीने सोमवारी शिवाजी विद्यापीठास नित्यम दीपकाम प्रायव्हेट लिमिटेडकडून 'लेटर ऑफ इन्टेन्ट' प्राप्त झाले आहे. यावर विद्यापीठाकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कंपनीतर्फे डी. जी. गुणे यांनी स्वाक्षरी केल्या. दरम्यान, यावेळी खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते रुसा केंद्राच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. खासदार महाडिक यांनी यावेळी केंद्रातील संशोधन सुविधांची फिरुन पाहणी केली. त्याचप्रमाणे डॉ. अरविंदेकर यांच्याकडून तेथे सुरु असलेल्या विविध संशोधनाची माहिती घेतली. (प्रतिनिधी)

### उपयुक्त संशोधन

मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत १५ वर्षांपासून संशोधन करुन औषधांची निर्मिती केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून आम्ही केलेले हे संशोधन निश्चितपणे उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रा. अरविंदेकर यांनी व्यक्त केला आहे.

18 APR 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन सुविधांच्या निर्मितीवर 'रुसा'चा भर

- ना. प्रकाश जावडेकर यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठाच्या रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स्‌चे डिजिटल पद्धतीने उद्‌घाटन
- व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधेद्वारे देशभरातील शिक्षण संस्थांशी संवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्चशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी संशोधकीय पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यास 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत' (रुसा) प्राधान्य देण्यात येत आहे. त्याची सुरुवात आज देशातील सतरा महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून होते आहे, ही अत्यानंदाची बाब आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी सोमवारी केले.

नवी दिल्लीतील मंत्रालयाच्या मुख्यालयातून ना. जावडेकर यांनी सकाळी शिवाजी विद्यापीठासह देशभरातील सतरा विद्यापीठांमधील रुसाअंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध सुविधांचे डिजिटल उद्‌घाटन केले. त्यावेळी ते संवाद साधत बोलत होते. या उद्‌घाटन समारंभामध्ये पहिला सन्मान शिवाजी विद्यापीठाच्या नॅचरल प्रोडक्ट्स अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिन केंद्रास प्राप्त झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक (रुसा) श्रीमती मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हीस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हीस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटीलयांच्यासहविविधविद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री जावडेकर म्हणाले, 'उच्चशिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी सुमारे २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील सुमारे १३०० कोटी रुपयांचे वितरण 'रुसा'च्या अंतर्गत करण्यात येत आहे. आजपर्यंतचा हा सर्वोत्कृष्ट उपक्रम असून रुसा ही केवळ मॉनिटरिंग एजन्सी नाही, तर उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही तिच्याकडून अपेक्षित आहे. ज्या शिक्षण संस्था दर्जा कायम राखतील, त्यांनाच 'रुसा'च्या माध्यमातून निधी प्रदान करण्यात येईल. तसेच, ज्या सुविधेसाठी निधी वितरित करण्यात आला आहे, त्यासाठीच त्याचे उपयोजना करणे आवश्यक आहे,' असेही ते म्हणाले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देशभरातील १७ शिक्षण संस्थांमधील रुसा सुविधा केंद्रांचे अवघ्या तासाभरात उद्‌घाटन करण्यात आले, ही फार महत्त्वाची बाब आहे.'

ना. जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून शिवाजी विद्यापीठाच्या नॅचरल प्रोडक्ट्स अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिनविषयक रुसा केंद्राचे डिजिटल लॉंचिंग केले. त्यावेळी शिवाजी विद्यापीठातील या केंद्राची आपण प्रत्यक्ष पाहणी केलेली असून तेथे उत्तम सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत, अशी विशेष टिप्पणी केली. यावेळी जावडेकर यांच्या हस्ते 'रुसा'चे पोर्टल आणि मोबाईल ॲप्लीकेशनचेही उद्‌घाटन करण्यात आले. नवी दिल्ली येथून 'रुसा'च्या राष्ट्रीय मिशन संचालक इशिता रॉय यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव केवलकुमार शर्मा यांनीही या प्रसंगी मनोगत व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रुसा केंद्राचे डिजिटल लॉंचिंग केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून केले. याप्रसंगी विद्यापीठात उपस्थित खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेड विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे आदी.**

## शिवाजी विद्यापीठाचे मोलाचे काम

शिवाजी विद्यापीठातील रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिन उभारण्यासाठी 'रुसा'कडून सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. यातून अत्याधुनिक संशोधन सामग्रीने सुसज्ज असे केंद्र विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्युट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय, समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना मधुमेहविषयक संशोधनासाठी स्वतंत्रपणे पस्तीस लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. त्यासंदर्भातही या केंद्रात संशोधन कार्य करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 APR 2017
पुढारी

# विद्यापीठाच्या मधुमेहविषयक संशोधनाचे होणार औद्योगिक हस्तांतरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या पंधरा वर्षांच्या अथक संशोधनातून निर्माण करण्यात आलेल्या मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या तंत्रज्ञानाचे लवकरच हस्तांतरण करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील सामंजस्य कराराचा प्राथमिक टप्पा म्हणून लेटर ऑफ इंटेंटवर सोमवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.



**कोल्हापूर : हस्तांतरणाबाबत लेटर ऑफ इंटेंटवर स्वाक्षरी केल्यानंतर डावीकडून मीता राजीवलोचन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक, डी. जी. गुणे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. अकल्पिता अरविंदेकर या गेल्या पंधरा वर्षांपासून मधुमेहपूर्व ते मधुमेह होण्याच्या वाटचालीस प्रतिबंध करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करीत आहेत. त्यासाठी त्यांना ३५ लाख रुपयांचा विशेष प्रकल्पही मंजूर झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधक टीम मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत संशोधन करीत आहे.

या टीमने मानवावर घेतलेल्या चाचण्याही कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे हे मधुमेहपूर्व उपचारविषयक तंत्रज्ञान व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आता औद्योगिक हस्तांतरणास सज्ज आहे. त्या दृष्टीने आज शिवाजी विद्यापीठास नित्यम दीपकाम प्रा.लि., कोल्हापूर या कंपनीकडून लेटर ऑफ इंटेंटवर प्राप्त झाले आहे. यावर आज शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कंपनीच्या वतीने डी. जी. गुणे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

दरम्यान, यावेळी खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते रुसा केंद्राच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. खा. महाडिक यांनी यावेळी केंद्रातील संशोधन सुविधांची फिरून पाहणी केली. त्याचप्रमाणे डॉ. अरविंदेकर यांच्याकडून तेथे सुरू असलेल्या विविध संशोधनाचीही माहिती घेतली.

18 APR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मधुमेह प्रतिबंध तंत्रज्ञानाचे होणार हस्तांतर

## प्राथमिक लेटर ऑफ इन्टेन्टवर मान्यवरांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या पंधरा वर्षांच्या अथक संशोधनातून निर्माण करण्यात आलेल्या मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या तंत्रज्ञानाचे लवकरच हस्तांतर करण्यात येणार आहे. त्या संदर्भातील सामंजस्य कराराचा प्राथमिक टप्पा म्हणून लेटर ऑफ इन्टेन्टवर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव श्रीमती मीता राजीवलोचन यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

विद्यापीठातील प्रा. डॉ. अकल्पिता अरविंदेकर पंधरा वर्षांपासून मधुमेह-पूर्व ते मधुमेह होण्याच्या वाटचालीस प्रतिबंध करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करीत आहेत. त्यासाठी त्यांना ३५ लाख रुपयांचा विशेष प्रकल्पही मंजूर झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधक टीम मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत संशोधन करीत आहे. या टीमने घेतलेल्या चाचण्याही कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे हे मधुमेहपूर्व उपचारविषयक



तंत्रज्ञान व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आता औद्योगिक हस्तांतरणास सज्ज आहे.

त्या दृष्टीने विद्यापीठास नित्यम दीपकाम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून लेटर ऑफ इंटेन्ट प्राप्त झाले आहे. यावर आज विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कंपनीच्या वतीने डी. जी. गुणे यांनी स्वाक्षरी केल्या.

दरम्यान, या वेळी खासदार महाडिक यांच्या हस्ते रुसा केंद्राच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. श्री. महाडिक यांनी या वेळी केंद्रातील संशोधन सुविधांची फिरून पाहणी केली. त्याचप्रमाणे डॉ. अरविंदेकर यांच्याकडून तेथे सुरू असलेल्या विविध संशोधनाचीही माहिती घेतली.

18 APR 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मधुमेह संशोधन तंत्रज्ञानाचे होणार औद्योगिक हस्तांतरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या १५ वर्षांच्या अथक संशोधनातून निर्माण करण्यात आलेल्या मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या तंत्रज्ञानाचे लवकरच हस्तांतरण करण्यात येणार आहे. त्या संदर्भातील सामंजस्य कराराचा प्राथमिक टप्पा म्हणून 'लेटर ऑफ इन्टेन्ट'वर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुविधांची माहिती घेताना खासदार धनंजय महाडिक. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. अकल्पिता अरबिंदेकर, मीता राजीवलोचन, डॉ. संजय देशमुख आदी.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. अकल्पिता अरविंदेकर या गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहपूर्व ते मधुमेह होण्याच्या वाटचालीस प्रतिबंध करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करीत आहेत. त्यासाठी त्यांना ३५ लाख रुपयांचा विशेष प्रकल्पही मंजूर झाला आहे. हे मधुमेहपूर्व उपचारविषयक तंत्रज्ञान व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आता औद्योगिक हस्तांतरणास सज्ज आहे. त्या दृष्टीने विद्यापीठाला नित्यम दीपकाम प्रा.लि., कोल्हापूर या कंपनीकडून 'लेटर ऑफ इंटेन्ट' प्राप्त झाले आहे. यावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कंपनीच्या वतीने डी.जी. गुणे यांनी स्वाक्षरी केली.

1 8 APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मधुमेह प्रतिबंधक संशोधन तंत्रज्ञानाचे होणार औद्योगिक हस्तांतरण

## शिवाजी विद्यापीठ-नित्यम दीपकाम कंपनीमध्ये सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या १५ वर्षांच्या अथक संशोधनातून निर्माण करण्यात आलेल्या मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या तंत्रज्ञानाचे लवकरच हस्तांतरण करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील सामंजस्य कराराचा प्राथमिक टप्पा म्हणून नित्यम दीपकाम प्रा. लि. कंपनीच्या 'लेटर ऑफ इंटेंट'वर सोमवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक, प्रधान सचिव मीता राजीवलोचन यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.



**कोल्हापूर : संशोधन तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणप्रसंगी मीता राजीवलोचन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक, डी. जी. गुणे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

शिवाजी विद्यापीठातील प्रा. अकल्पिता अरविंदेकर या गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहपूर्व ते मधुमेह होण्याच्या वाटचालीस प्रतिबंध करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करत आहेत. त्यासाठी त्यांना ३५ लाख रुपयांचा विशेष प्रकल्पही मंजूर झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधक टीम मधुमेहाला प्रतिबंध करणाऱ्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत संशोधन करत आहेत. या टीमने मानवावर घेतलेल्या चाचण्याही कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे हे मधुमेहपूर्व उपचारविषयक तंत्रज्ञान व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आता औद्योगिक हस्तांतरणास सज्ज झाले आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठास नित्यम दीपकाम प्रा. लि., कोल्हापूर या कंपनीकडून 'लेटर ऑफ इंटेंट' प्राप्त झाले आहे. यावर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कंपनीच्या वतीने डी. जी. गुणे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

1 8 APR 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायाभूत सुविधांना 'रुसा'चे प्राधान्य

» पान १ वरून

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटील उपस्थित होते.

श्री. जावडेकर म्हणाले, "उच्चशिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी सुमारे २८०० कोटींची तरतूद केली आहे. त्यातील १३०० कोटींचे वितरण 'रुसा'च्या अंतर्गत करण्यात येत आहे. आजपर्यंतचा हा सर्वोत्कृष्ट उपक्रम असून रुसा ही केवळ मॉनिटरिंग एजन्सी नाही, तर उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही तिच्याकडून अपेक्षित आहे. ज्या शिक्षण संस्था दर्जा कायम राखतील, त्यांनाच रुसाच्या माध्यमातून निधी प्रदान करण्यात येईल. तसेच ज्या सुविधेसाठी निधी वितरित केला आहे.

जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून विद्यापीठाच्या नॅचरल प्रॉडक्टस् अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिनविषयक रुसा केंद्राचे डिजिटल लॉंचिंग केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या नामफलकाचे अनावरण करताना खासदार धनंजय महाडिक व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, प्रधान सचिव मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नांदेडचे प्र-कुलगुरू डॉ. जी.एन. शिंदे, श्री. डी.जी. गुणे.

त्यावेळी शिवाजी विद्यापीठातील या केंद्राची आपण प्रत्यक्ष पाहणी केलेली असून तेथे उत्तम सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत, असे स्पष्टीकरण दिले. श्री. जावडेकर यांच्या हस्ते रुसाचे पोर्टल आणि मोबाईल ॲप्लिकेशनचेही उद्घाटन झाले. नवी दिल्ली येथून रुसाच्या राष्ट्रीय मिशन संचालक इशिता रॉय यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव केवलकुमार शर्मा यांनीही मनोगत व्यक्त केले.

### शिवाजी विद्यापीठासाठी दीड कोटी

शिवाजी विद्यापीठातील रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रॉडक्टस् अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिन उभारण्यासाठी 'रुसा'कडून सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. यांतून अत्याधुनिक संशोधन सामग्रीने सुसज्ज असे केंद्र विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्युट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

1 8 APR 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायाभूत सुविधांना 'रुसा'चे प्राधान्य

## प्रकाश जावडेकर : देशातील १७ विद्यापीठांमधील डिजिटल सुविधांचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : उच्चशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी संशोधकीय पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यास 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) प्राधान्य दिले जात आहे. त्याची सुरवात देशातील १७ महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून आज होत आहे. ही आनंदाची बाब आहे, असे मत केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी आज व्यक्त केले.

श्री. जावडेकर यांनी आज सकाळी नवी दिल्लीतील मंत्रालयाच्या मुख्यालयातून शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसांतर्गत उभारलेल्या विविध सुविधांचे डिजिटल उद्‌घाटन केले. त्यावेळी ते बोलत होते. उद्‌घाटनाचा पहिला सन्मान शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅचरल प्रॉडक्टस् अँड अल्टरनेटिव्ह मेडिसिन' केंद्रास मिळाला.

या वेळी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक (रुसा) मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, पान २ वर »



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'रुसा' केंद्राचे डिजिटल लाँचिंग केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून केले. या वेळी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात उपस्थित धनंजय महाडिक, मीता राजीवलोचन, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. संजय देशमुख, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जी. एन. शिंदे.

18 APR 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन सुविधा निर्मितीवर 'रुसा' भर देणार

## मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर : शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स'चे दिल्लीतून डिजिटल उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

'उच्चशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी संशोधकीय पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यास 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत' (रुसा) प्राधान्य देण्यात येत आहे. त्याची सुरुवात आज देशातील १७ महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून होत आहे, ही आनंदाची बाब आहे,' असे प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी केले.

मंत्री जावडेकर यांनी सोमवारी नवी दिल्ली येथून मंत्रालयाच्या मुख्यालयातून शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसा'अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध सुविधांचे डिजिटल उद्घाटन केले, या प्रसंगी ते बोलत होते.

मंत्री जावडेकर म्हणाले, "उच्चशिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी सुमारे २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील सुमारे १३०० कोटी रुपयांचे वितरण 'रुसा'अंतर्गत करण्यात येत आहे. रुसा ही केवळ मॉनिटरिंग एजन्सी नाही, तर उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही तिच्याकडून अपेक्षित आहे. ज्या शिक्षण संस्था दर्जा कायम राखतील, त्यांनाच रुसाच्या माध्यमातून निधी प्रदान करण्यात येईल. तसेच, ज्या सुविधांसाठी निधी वितरित करण्यात आला आहे, त्यासाठीच त्याचे उपयोजन करणे आवश्यक आहे." 'शिवाजी विद्यापीठातील या केंद्राची आपण प्रत्यक्ष पाहणी केलेली असून तेथे उत्तम सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत,' अशी विशेष टिप्पणीही त्यांनी केली. जावडेकर यांच्या हस्ते 'रुसा'चे पोर्टल आणि मोबाईल ॲप्लिकेशनचेही उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव केवलकुमार शर्मा यांनी मनोगत व्यक्त केले. नवी दिल्ली येथून रुसाच्या राष्ट्रीय मिशन संचालक इशिता रॉय यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना मधुमेहविषयक संशोधनासाठी स्वतंत्रपणे ३५ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. त्या संदर्भातही या केंद्रात संशोधन कार्य करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक (रुसा) श्रीमती मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'रुसा' केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, प्रधान सचिव मीता राजीवलोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, डॉ. विलास नांदवडेकर, नांदेडचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, डी. जी. गुणे आदी.**

### रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स ॲण्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन

शिवाजी विद्यापीठातील रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स एन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन उभारण्यासाठी 'रुसा'कडून सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. यातून अत्याधुनिक संशोधन सामग्रीने सुसज्ज असे केंद्र विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्युट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

1 8 APR 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Javadekar inaugurates RUSA centre online

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Human resources development minister Prakash Javadekar digitally inaugurated the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) centre for natural products along with 16 other projects at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Monday.

During the inauguration from New Delhi, the minister said, "In order to enhance the quality of higher education across the country, we must upgrade the facilities for the researchers first."

He said that RUSA will remain a top priority. "The work has just started and has a long way to go. The Union government has made a provision of Rs 2,800 crore for improving the quality of higher education across the country. Of the total provision that has been made, Rs 1,300 crore has been allotted to RUSA,"he said.

"RUSA is not only a monitoring agency but we are expecting that it will improve the quality of education across the country. The academic institutes with good performance over a period of time will be eligible for funding from RUSA," he said while explaining the benefits of RUSA.

**The centre has made a provision of Rs 2,800 crore for improving the quality of higher education. Of the total provision that has been made, Rs 1,300 crore has been allotted by RUSA**

Javadekar made a special mention of his visit to the SUK and the excellent facility of natural products and alternative medicine centre over there.

An SUK official said, "This centre has receieved Rs1.5crore funding from RUSA, due to which the centre is equipped with latest research facilities. The centre contains the medicine and cosmetic facilities."

"The centre coordinator Akalpita Arvindekar has also been awarded with Rs 35 lakh funding for her project on Diabetes, which will be executed at the centre," the official added.

18 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रुसा'चा संशोधनाला फायदा होईल

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

उच्चशिक्षणाचा दर्जा वाढावा यासाठी संशोधन महत्त्वाचे आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहेत. या सुविधा निर्मितीला राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानतर्गंत (रुसा) प्राधान्य देत आहे. त्याची सुरवात देशातील १७ महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून होते आहे. त्याचा फायदा संशोधकांना होईल, असे प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी केले.

नवी दिल्लीतील मंत्रालयाच्या मुख्यालयातून शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसा'अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध सुविधांचे डिजिटल उद्घाटन सोमवारी झाले. त्यावेळी ते व्हिडिओ कॉन्सफरन्सव्दारे बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'नॅचरल प्रोडक्ट्स अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसिन' केंद्राचे डिजिटल उद्घाटन झाले.

केंद्रीय मंत्री जावडेकर म्हणाले, 'उच्चशिक्षणाचा दर्जा वाढण्यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील १३०० कोटी रुपयांचे वितरण 'रुसा'तर्गंत करण्यात येत आहे. रुसा केवळ मॉनिटरींग एजन्सी नसून उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही अपेक्षित आहे.'

यावेळी खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालिका (रुसा) मीता राजीव लोचन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, 'रुसा'चे सहसंचालक शरद पाटील आदी उपस्थित होते.



अमित गद्रे

**'नॅचरल प्रोडक्ट्स अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन' केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी डावीकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्रीमती मीता राजीवलोचन, खासदार धनंजय महाडिक.**

### दीड कोटींचा निधी

शिवाजी विद्यापीठातील रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन उभारण्यासाठी 'रुसा'कडून दीड कोटी रुपयांचा निधी मिळाला. त्यातून अत्याधुनिक केंद्र विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्युट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना मधुमेहविषयक संशोधनासाठी स्वतंत्रपणे ३५ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.

1 8 APR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रकाश जावडेकर : शिवाजी विद्यापीठातील नॅचरल प्रॉडक्टस् अँड अल्टरनेटिव्ह मेडिसीन केंद्राचे 'डिजिटल' उद्घाटन

# उच्च शिक्षणासाठी १३०० कोटींचा निधी

कोल्हापूर : उच्च शिक्षणासाठी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) १३०० कोटी रुपयांचा निधी विविध महाविद्यालये व विद्यापीठांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी दिली. उच्च शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी या उपक्रमाचा चांगला फायदा होऊ शकेल, असे जावडेकर यांनी यावेळी सांगितले.

नवी दिल्ली येथील मंत्रालयाच्या मुख्यालयातून मंत्री जावडेकर यांनी सोमवारी सकाळी दहा वाजता शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसा'अंतर्गत उभारलेल्या विविध सुविधांचे डिजीटल उद्घाटन केले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅचरल प्रॉडक्टस अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन'(नैसर्गिक पदार्थ आणि पर्यायी औषधी केंद्र) केंद्राचे उद्घाटन जावडेकर यांनी दिल्लीतील मंत्रालयात बसून केले.

मंत्री जावडेकर म्हणाले, उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुविधांसाठी सुमारे २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

त्यातील सुमारे १३०० कोटी रुपयांचे वितरण 'रुसा'अंतर्गत करण्यात येत आहे. रुसा ही केवळ मॉनिटरिंग एजन्सी नाही, तर उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे कार्यही तिच्याकडून अपेक्षित आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी संशोधकीय पायाभूत सुविधांच्या निर्मितीस रुसा प्राधान्य देत आहे. त्याची सुरुवात आज देशातील १७ महत्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून होत आहे.

दरम्यान, या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, 'रुसा'च्या प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक मीता राजीवलोचन, सहसंचालक शरद पाटील, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. जी. एन. शिंदे, प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकुंपिता अरविंदेकर, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

## देशभरातील १७ प्रकल्पांचे ऑनलाईन उद्घाटन

यावेळी जम्मू आणि काश्मीर, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, झारखंड आदी राज्यांमधील १७ प्रकल्पांचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठातील नॅचरल प्रॉडक्टस् अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीनविषयक रुसा केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. तेथे उत्तम सुविधा उपलब्ध असल्याचे मंत्री जावडेकर यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या हस्ते 'रुसा'चे पोर्टल आणि मोबाईल अॅप्लीकेशनचेही उद्घाटन झाले. रुसाच्या राष्ट्रीय मिशन संचालक इशिता रॉय, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव केवलकुमार शर्मा यांनी मनोगत व्यक्त केले.



व्हिडिओ कॉन्फरसिंग सुविधेद्वारे सोमवारी देशभरातील शिक्षण संस्थांशी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी संवाद साधला.

## विद्यापीठात वनौषधींवर प्रक्रियेची सुविधा

रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रॉडक्ट्स एन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन उभारण्यासाठी 'रुसा'कडून सुमारे वीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. त्यातून अत्याधुनिक संशोधन सामग्रीने सुसज्ज असे केंद्र शिवाजी विद्यापीठात साकारले आहे. केंद्रात औषधे, न्यूट्रास्युटिकल आणि कॉस्मेटिक उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या वनौषधींवर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या रुसा केंद्राचे डिजिटल लॉचिंग सोमवारी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून केले. या कार्यक्रमावेळी विद्यापीठात डावीकडून नांदेड विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. जी. एन. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, 'रुसा'च्या प्रधान सचिव मीता राजीवलोचन, खासदार धनंजय महाडिक, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
18 APR 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांना अभिवादन

**कोल्हापूर :** महात्मा जोतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, उमेश भोसले, अविनाश भाले, डॉ. निलीशा देसाई आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 APR 2017

तरूण भारत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास २० एप्रिलपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यासाठीच्या तारखा १ एप्रिल रोजी प्रसिध्द केल्या होत्या. तांत्रिक अडचणीमुळे प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. १५ ते २० एप्रिलपर्यंत नियमित शुल्क २०० रूपये, २० ते २३ एप्रिलपर्यंत विलंबशुल्क ३०० रूपये, तसेच २५ एप्रिलपर्यंत अतिविलंब शुल्क ८०० रूपये भरून विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. प्रवेश अर्ज परीक्षेसंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.